Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 May 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १५ मे २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

मणिपूरच्या चंडेल जिल्ह्यात एका संशयित दहशतवादी गटाच्या दहा सदस्यांना भारतीय लष्कराच्या पूर्व कमांडने आज सकाळी ठार केलं आहे. विशिष्ट गुप्तचर अहवालाच्या आधारे, या भागात भारतीय जवानांनी कारवाई सुरु केली असता दहशतवाद्यांनी जवानांवर हल्ला केला. भारतीय जवानांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात दहा दहशतवादी ठार झाले असून मोठ्या प्रमाणात शस्त्रं आणि दारूगोळा जप्त करण्यात आल्याची माहिती पुर्व लष्करानं सामाजिक माध्यमाद्वारे दिली आहे. तर जम्मू-काश्मीरमधील अवंतीपोरा इथल्या त्राल भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरु असून भारतीय जवानांनी दोन दहशतवाद्यांना घेरल्याचं वृत्त आहे.

****

दरम्यान, भारत पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभुमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज सकाळी जम्मू आणि काश्मीरला रवाना झाले आहेत. ते तेथे सुरक्षा आढावा बैठक घेणार आहेत.

****

भारत पाकिस्तान संघर्षादरम्यान पाकिस्तानच्या बाजूनं उभं राहणाऱ्या तुर्कीएसोबतचा सामंजस्य करार जवाहरलाल नेहरु विद्यापीठ-जेएनयूनं रद्द केला आहे. तुर्कीएच्या इनोनू विद्यापीठासोबत केलेला करार भारताच्या सुरक्षेचा विचार करुन रद्द करत असल्याचं जेएनयूनं म्हटलं आहे. अनेक पर्यटन कंपन्यांनीही तुर्कीए आणि अझरबैजानमधली नोंदणी रद्द केली, त्यामुळं तुर्कीएला जाणाऱ्या सुमारे १५ हजार प्रवाशांचीही नोंदणी रद्द झाली आहे. पुण्यातल्या सुका मेवा व्यापाऱ्यांनीही तुर्कीएमधून येणाऱ्या सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला आहे. पुणे मार्केट यार्ड परिसरातल्या व्यापारी संघटनेनं आधी देश नंतर व्यापार, अशी भूमिका घेतली आहे.

****

महाराष्ट्र सरकारची अधिकृत वेबसाइट www.maharashtra.gov.in आणि सरकारी निर्णय-जीआर पोर्टल www.gr.maharashtra.gov.in नियमित देखभाल आणि तांत्रिक अद्यावतीकरणामुळे आज आणि उद्या दोन दिवस बंद राहील. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळानं ही माहिती जारी केली आहे. या कालावधीत अधिकृत सरकारी पोर्टलवर कोणत्याही सेवा उपलब्ध नसतील. राज्यातील नागरिक, सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही वेळ पाळण्यास सांगण्यात आलं आहे.

****

राज्यातील सैनिकी शाळांच्या शैक्षणिक सुधारणांसाठी राज्यस्तरीय समिती गठीत करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यासंदर्भात काल मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. या समितीनं सैनिकी शाळांतील शैक्षणिक सुधारणा, गुणवत्ता, प्रवेशप्रक्रिया, सीबीएसई अभ्यासक्रम आणि शाळांच्या विविध मागण्यासंदर्भात अभ्यास करून एक महिन्यात राज्य शासनाकडे अहवाल सादर करावा. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी हिताचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

****

ड्रोन्सना निकामी करु शकणाऱ्या भार्गवास्त्र या प्रणालीची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. सोलार डिफेन्स अँड एरो स्पेस लिमिटेड या कंपनीनं तयार केलेल्या या भार्गवास्त्र प्रणालीत सूक्ष्म रॉकेट्स वापरले जातात. एकाचवेळी अनेक ड्रोन्सच्या समूहांना केवळ दोन सेकंदात निकामी करण्याची क्षमता आणि अडीच किलोमीटरपर्यंत मारा करण्याची क्षमता या भार्गवास्त्र प्रणालीत आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेअंतर्गत दोन जोडप्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्या हस्ते काल धनादेश वितरण समारंभ पार पडला. २०२४-२५ या वर्षात वीस जोडप्यांना एकूण दहा लाख रुपयांचे अनुदान वितरित होणार आहे. प्रत्येक जोडप्याला २५ हजार रुपयांचा धनादेश आणि २५ हजारांचे बचतपत्र असे एकूण ५० हजार रुपये दिले जातात.

****

ठाणे जिल्ह्यातल्या मुंब्रा इथल्या बनावट चलन प्रकरणातील प्रमुख आरोपींपैकी एक इशाक खान याला काल मुंबईतल्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयानं पाच वर्षांची सक्तमजुरी आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. २०२० साली एनआयए नं या प्रकरणी इशाक खानला कोलकाता कारागृहातून ताब्यात घेतलं होतं. सलग पाच वर्ष चाललेल्या सुनावणीदरम्यान इशाक खाननं न्यायालयासमोर आपला गुन्हा मान्य केला, त्यानंतर काल त्याला शिक्षा ठोठावण्यात आली, उर्वरित दोन्ही आरोपींविरूद्ध अद्यापही खटला सुरू आहे.

****

बँकॉकमध्ये होणाऱ्या थायलंड बॅडमिंटन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय खेळाडू आज आपले सामने खेळतील. पुरुष एकेरीत, थरुन मन्नेपल्लीचा सामना डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनशी होईल. मन्नेपल्लीनं मलेशियाच्या जस्टिन होचा २१-१९, २१-१६ असा सरळ सेटमध्ये पराभव करून शेवटच्या १६ मध्ये स्थान मिळवलं.

महिला एकेरीत, भारताची अव्वल खेळाडू मालविका बनसोड थायलंडच्या रत्चानोक इंतानोनशी लढेल. भारताची उन्नती हुड्डा थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगशी तर आकर्शी कश्यप थायलंडच्या सुपानिदा काटेथोंगशी लढेल.

महिला दुहेरीत, त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद ही भारतीय जोडी जपानच्या सायाका होबारा आणि रुई हिरोकामी यांच्याविरुद्ध खेळेल. मलेशियाच्या ओंग शिन यी आणि कार्मेन टिंग यांच्यावर २१-१५, २१-१३ असा सनसनाटी विजय मिळवत भारतीय जोडीने प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला.

****